जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २५६** **दिनांक :- १४/०९/२०२१**

## दागिन्यांना डिझाईन करुन देण्याच्या बहाण्याने १३,७६,०००/- रु. किंमतीचे सोने व हि-याचे दागिने घेवून पसार झालेल्या आरोपीतास अटक.

श्री. मधुसुदन विश्वनाथ घोष यांचा सोने व हि-याच्या दागिन्यांना डिझाईन करण्याचा व्यवसाय असून त्यांचे कारखान्यामध्ये दागिन्यांना डिझाईन करण्यासाठी बिश्वनाथ (पुर्ण नाव,पत्ता माहित नाही) या कर्मचा-यास कामावर ठेवलेले होते. श्री. मुधसुदन घोष यांनी दिनांक १०.०९.२०२१ रोजी कारागीर बिश्वनाथ याचेकडे १३,७६,०००/- रु. किंमतीचे सोने व हि-याचे दागिने, सोन्याचे कानातील रिंग व सोन्याची अंगठी असे डिझाईन करण्यासाठी दिले होते. माञ कारागीर बिश्वनाथ हा सदरचे दागिने घेवून दि. ११.०९.२०२१ रोजी पळुन गेला होता त्याबाबत तक्रारदार श्री मधुसुदन घोष यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ६३२/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३८१ प्रमाणे नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री. मधुसुदन विश्वनाथ घोष, वय ३६ वर्षे यांनी कामावर ठेवलेल्या कोणत्याही कारागीरांचे पुर्ण नाव व पत्ताची किंवा कोणतेही ओळखपत्रबाबत माहिती न घेता कामावर ठेवले होते. दि. ०८.०९.२०२१ रोजी यातील आरोपी हा फिर्यादी यांचेकडे काम करण्यासाठी आला व दि. ११.०९.२०२१ रोजी सदरचा गुन्हा करुन पळुन गेला होता. यावरुन आरोपी हा सदरचा गुन्हा करण्याचे उद्देशानेच फिर्यादी यांचेकडे आला असल्याचे दिसुन आल्याने पोलीस पथकाने तपासाची गती वाढवुन आरोपीचा कोणताही पुरावा किंवा कुठल्याही प्रकारची माहिती नसतांना गुन्हयाचा तांत्रीक दृष्टीने तपास करुन बातमीदारांमार्फत अवघ्या एका दिवसात आरोपीस आंबोजवाडी येथील झोपडपट्टी, मालवणी, मालाड, मुंबई येथुन अटक करुन आरोपीताकडुन तपासादरम्यान १३,७६,०००/- रु. किं.ची संपुर्ण मालमत्ता हस्तगत केली असुन गुन्हयाची उकल करुन उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात फिर्यादी प्रमाणे व्यवसाय करणा-या व्यवसाय धारकांनी त्यांचेकडे काम करणारे कारागीरांचे पुर्ण नाव, सध्याचा व गावचा पत्ता, ओळखपत्र व फोटो अशी माहिती घेणेबाबत पोलीसांव्दारे आवाहन करण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोना/२९५६ ऐन्नोद्दीन शेख, पोशि/३४५८ संदिप जाधव,पोशि/२८३८ युनुस गिरगावकर, पोशि/०५०८९२ आमीतकुमार पाटील पाटील यांनी केली आहे.